रे.दिवाणी दावा क्र. ८५/२०१४
सागर विरुध्द विठ्ठल वगैरे

<u>सीएनआर नं. एमएचपीयु१८-००८६०-२०१४</u>

## नि. २३ वर आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्तीसाठी दाखल करुन त्रयस्त इसम सचिन सोमनाथ सातव, निलेश रघुनाथ सातव व सुहास उत्तम पिलाने यांची नावे मुळ दाव्यामध्ये समाविष्ट करण्याकरीता व त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील कथनांचा विचार करता सचिन सोमनाथ सातव व निलेश रघुनाथ सातव यांना प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ यांनी रजिस्टर खरेदीदस्त क्र.३६५६/२०१५ दि.१०/०८/२०१५ प्रमाणे खरेदी दिलेला आहे. त्याप्रमाणे सचिन सोमनाथ सातव व निलेश रघुनाथ सातव यांची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यास नोंद झालेली आहेत. त्यानंतर सचिन सोमनाथ सातव व निलेश रघुनाथ सातव यांनी दावा मिळकतीस त्यांच्या नावाची नोंद असल्याचा फायदा घेवुन सुहास उत्तम पिलाने यांना त्यांचे क्षेत्र रजिस्टर खरेदीदस्त क्र. ४१६४/२०२२ दि.०३/०६/२०२२ प्रमाणे विक्री केलेले आहे. त्यामुळे वादी यांनी सचिन सोमनाथ सातव, निलेश रघुनाथ सातव व सुहास उत्तम पिलाने यांना प्रस्तुतकामी सामील करुन घेण्याकरीता व त्याअनुषंगाने अत्यावश्यक असणा-या मजकुराबाबत दुरुस्ती होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला. तसेच सचिन सोमनाथ सातव व निलेश रघुनाथ सातव यांनी प्रस्तुतकामी दिलेला नि.१८ वरील अर्ज यापुर्वीच या न्यायालयाने मंजुर केलेला आहे.

४. प्रस्तुत अर्जातील कथने, नि.१८ अर्जावरील आदेश व नि. २५ कागदयादी सोबत दाखल कागदपत्रांचा विचार करता प्रस्तुत अर्जातील वादी यांनी मागितलेली दुरुस्ती प्रस्तुतदाव्याच्या कामी होणे न्यायाच्या दृष्टीकोनातुन गरजेचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीतः

**आदेश**

१. वादी यांचा नि.२३ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत करुन दावा दुरुस्तीप्रत अभिलेखावर दाखल करावी.

**सही/-**

(जी.ए. कुलकर्णी)
४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, ता. दौंड, जि. पुणे

दि.१३/०९/२०२२
ठिकाण - दौंड